महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

महाराष्ट्र शासन
इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/1954 /2024-25 दिनांक -05/08/2024

## -:योजनेचा सुधारित तपशील:-

**महाज्योती मार्फत "महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) मुख्य परीक्षा -2023 उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व चाचणी/ मुलाखतीकरीता अर्थ सहाय्य योजना"**

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) मुख्य परीक्षा - 2023 (दि.16/07/2024 रोजी MPSC ने जाहीर केलेल्या निकालाप्रमाणे) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व चाचणी/ मुलाखतीकरीता एकरकमी अर्थसहाय्य योजनेकरीता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**योजनेचे स्वरुप** :- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) मुख्य परीक्षा -2023 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व चाचणी/ मुलाखतीकरीता पात्र नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना एकरकमी रक्कम **रु.**10,000/- आर्थिक सहाय्य महाज्योती मार्फत देण्यात येईल.

## योजनेच्या लाभासाठी पात्रता:

1. विद्यार्थी हा नॉन-क्रिमिलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गापैकी असावा.
2. विद्यार्थी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) मुख्य परीक्षा-2023 (**दि.16/07/2024** रोजी जाहीर झालेल्या निकालानुसार) उत्तीर्ण झालेला असावा.

## अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे:

1. आधार कार्ड
2. जातीचा प्रमाणपत्र
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र
4. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) मुख्य परीक्षा - 2023 प्रवेश पत्र
5. बँकचे तपशील (Account no, Name, IFSC code स्पष्ट असावे.)
6. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) मुख्य परीक्षा -2023 उत्तीर्ण झालेल्या निकालाची प्रत (बैठक क्रमांक ठळक करून देण्यात यावा.)

**अर्ज कसा करावा.**

1. महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **Application Invited For Financial Assistance Those Who Qualified For MPSC-(State Service) Personality/Interview Test-2023"** यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत वरील नमूद कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे.

**अटी व शर्ती** :

1. अर्ज करण्याचा अंतिम दि.10/08/2024 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
4. कोणत्याही माध्यमातुन व अंतिम निवड प्रक्रियेच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण किंवा दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास तो/ती विद्यार्थी कायदेशीर कारवाईस पात्र राहिल.
5. ज्या अर्थी शासन निर्णय क्र.सान्यावि - 2023/प्र-क्र.60(4) दि.30/10/2023 मध्ये नमुद आहे की, एक विद्यार्थी/उमेदवार अधिछात्रवृत्ती, शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, इत्यादींचा एकदाच लाभ घेण्यास पात्र राहील. त्या अर्थी विद्यार्थ्यांने यापुर्वी महाज्योतीच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला असल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या सारथी या संस्थेकडून सदर योजनेचा लाभ घेत असल्याचे आढळून आल्यास विद्यार्थ्यांचे अर्ज ग्राह्य धरल्या जाणार नाही.
6. नमुद निकषांची पुर्तता न करणाऱ्या, अपूर्ण अर्ज सादर करणाऱ्या किंवा अर्जासोबत कागदपत्रे न सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अर्ज बाद करण्यात येईल. त्याकरीता विभाग किंवा कार्यालय जबाबदार राहणार नाही.
7. विद्यार्थ्यांचे बॅंक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.
8. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा :

   **0712-2870120/21.**

स्वा

(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर.